

कोकणच्या लाल मातीला लागली शिमगोत्सवाची चाहूल

▶ पान २ वर

दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : १९९, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि. २ मार्च २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# नागपुर हादरलं ! कंपनीच्या भीषण स्फोटात १६ जणांचा मृत्यू

## १३ जण किरकोळ व गंभीर जखमी !

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०१, नागपूर :** नागपूर जिल्ह्यातील काटोल तालुक्यातील असलेल्या राऊळगाव येथील एस. बी. एल. इंडस्ट्रियल एक्सप्लोसिव्ह मॅन्युफॅक्चरर (SBL) एनर्जी लिमिटेड या स्फोटक तयार करणाऱ्या कंपनीत आज रविवारी सकाळी झालेल्या भीषण स्फोटात १६ कामगारांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये मोठ्या प्रमाणावर महिला कामगारांचा समावेश असून १३ जण गंभीर जखमी झाले आहेत. स्फोटाची तीव्रता इतकी प्रचंड होती की, त्याचा आवाज अनेक किलोमीटरपर्यंत ऐकू आला.

मिळालेल्या माहितीनुसार, ही हृदयद्रावक घटना सकाळी ६ ते ७ च्या सुमारास घडली. खाणींमधील खोदकामासाठी लागणारे 'डिटोनेटर' तयार करण्याचे काम सुरू असताना अचानक हा स्फोट झाला. या वेळी संबंधित युनिटमध्ये २५ ते ३० कामगार कार्यरत होते. स्फोटानंतर परिसरात धुराचे लोट पसरले आणि कंपनीच्या इमारतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले.

सुरुवातीला एका महिला कामगाराचा मृत्यू झाल्याचे वृत्त होते, मात्र जसजसे बचावकार्य पुढे सरकले, तसतसा मृतांचा आकडा वाढत गेला. आतापर्यंत १६ जणांनी या अपघातात आपला जीव गमावला आहे. काही मृतदेह गंभीररीत्या जळालेल्या अवस्थेत सापडले असून त्यांची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे.

**जखमींवर अतिदक्षता विभागात उपचार**

या दुर्घटनेत १८ कामगार गंभीर जखमी झाले असून, त्यांना तातडीने नागपूर येथील रुग्णालयात हलवण्यात आले आहे. जखमींमध्ये सर्व महिला कामगारांचा समावेश असल्याची धक्कादायक बाब समोर आली असून, त्यापैकी ४ जणांची प्रकृती अत्यंत चिंताजनक आहे.

**प्रशासकीय कारवाई आणि मदतकार्य**

घटनेची माहिती मिळताच जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आणि स्थानिक प्रशासन घटनास्थळी दाखल झाले. एनडीआरएफ आणि एसडीआरएफ ची पथके ढिगाऱ्याखाली अडकलेल्या कामगारांना बाहेर काढण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करत आहेत. स्फोटकांचा कारखाना असल्याने 'पेसो' आणि 'डिश' या तांत्रिक यंत्रणांची पथकेही तपासासाठी पाचारण करण्यात आली आहेत.

**घटनेची सखोल चौकशी होणार – देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री**

नागपूर जिल्ह्यातील राऊळगाव येथील स्फोटाची घटना अतिशय दुर्दैवी आहे. आम्ही सातत्याने स्थानिक प्रशासनाच्या संपर्कात आहोत. मृतांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी असून, या भीषण घटनेची सखोल चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी द्वारा शोक प्रकट !**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला असुन शासनाने मृतांना दोन लाख रुपये व जखमींना ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे.



**मृतकांना महाराष्ट्र शासनाने केली मदत जाहीर**

नागपूर जिल्ह्यातील राऊळगाव येथील एस बी एल इंडस्ट्रीयल एक्सप्लोसिव्ह मॅन्यूफॅक्चरर या कंपनीत झालेल्या स्फोटाच्या दुर्घटनेतील मृत नागरिकांच्या वारसांना पाच लाख रुपये आर्थिक मदत देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. तसेच, संबंधित कंपनी देखील मृत नागरिकांच्या वारसांना आर्थिक मदत करेल.

नागपूर जिल्ह्यातील SBL कंपनीत झालेल्या भीषण स्फोटात १६ जणांचा मृत्यू झाल्याची घटना अत्यंत दुःखद आणि वेदनादायी आहे. त्यांना माझी भावपूर्ण श्रद्धांजली! मृत्यू झालेल्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सर्वजण सहभागी आहोत. तसंच यातील जखमी लवकर बरे व्हावेत, ही प्रार्थना!
**चंद्रशेखर बावनकुळे पालकमंत्री, नागपूर**

# पेणचे आ. रविशेठ पाटील यांची बालगंगा प्रकल्पग्रस्तांच्या बेमुदत उपोषणाला भेट

**बेमुदत उपोषणाचा तिसरा दिवस**

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.०१, पेण (रायगड) :** बालगंगा धरणाचे काम गेली १६ वर्षापासून सुरू असून या धरणाचे काम जवळपास ८० % पूर्ण झाले असून अनेक वर्ष सुरु असलेल्या प्रकल्प ग्रस्तांच्या मागण्या कडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याने बाळगंगा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्याने विविध प्रलंबित मागण्यांसाठी तसेच कोरा झालेला सातबारा मूळ मालकांच्या नावे परत मिळावा या प्रमुख मागणीसाठी शुक्रवार दि २७ रोजी पासुन प्रांत कार्यालयासमोर बेमुदत उपोषणास बसले आहे. आज रविवारी उपोषणाला तिसरा दिवस असून पहिल्या दिवसापासून बालगंगा प्रकल्प ग्रस्ताच्या आंदोलनाला अनेक राजकीय पक्षाच्या पदाधिकारी व नेत्यांनी भेटी दिल्या आहेत. आज पेण मतदारसंघाचे आमदार रविशेठ पाटील यांनी बेमुदत उपोषण स्थली भेट देऊन उपोषण कर्त्यासोबत सविस्तर चर्चा करतांना सदर प्रश्न बाबत मंत्रालय स्तरावर बैठकीचे आयोजिन करून सदर प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.

रा जि प भाजप गटनेते यांनी बोलताना सांगितले की बालगंगा प्रकल्प ग्रस्ताचे प्रश्न



गेली अनेक वर्षे प्रलंबित असून जागेचे, फळझाडे, याचे मूल्याकन प्रलंबित आहेत गेली अनेक प्रश्न प्रलंबित असलेला बालगंगा प्रकल्प ग्रस्ताचे अजून पर्यत सुटले नाही, पेण मध्ये होउ घातलेला ग्रोथ प्रकल्पामुळे जमिनीच्या किमती वाढल्या आहेत परंतु १६ वर्ष पुर्वी बालगंगा धरणासाठी अधिग्रहण केलेल्या जमिनी अल्प दरात शासनाने घेतल्या आहेत काही जमिनीचे मूल्याकन झाले नाही परंतु सातबारा उतारा वर शिका पडल्याने विकता सुद्धा येत नाही आणि विशेष येथील शेतकऱ्यांना कोणत्याच योजनेचा लाभ मिळत नाही ही प्रकल्प ग्रताची फसवणूक झाल्या सारखी आहे आता बालगंगा प्रकल्प ग्रस्तना न्याय मिळवून देण्यासाठी शेवट पर्यत ठाम पाठिशी राहणार असल्याचे उपोषण स्थळीं सांगितले.

या उपोषणाला तिसऱ्या दिवशी पेणचे आमदार रविशेठ पाटील, जिल्हा परिषद भाजप गटनेते वैकुंठ पाटील, शिवसेना नेते प्रसाद भोईर, माजी नगरसेवक शोमेर पेणकर, माजी शिवसेना तालुका प्रमुख जगदीश ठाकूर, शिवसेना युवा अध्यक्ष चेतन मोकळं, योगेश पाटील यांनी उपोषण स्थळी भेट दिली आहे.

बाळगंगा धरण प्रकल्पासाठी सन २०१० पासून जमिनी संपादित करण्यात आल्या.आहेत जवळपास ८०% काम पूर्ण झाले आहे या प्रकल्पामुळे पेण तालुक्यातील नऊ गावे व तेरा आदिवासी वाड्यांतील सुमारे ३,८०० हून अधिक कुटुंबे बाधित झाली आहेत. एकूण १,२४० हेक्टर जमीन संपादित करण्यात आली होती. 'न्याय्य नुकसानभरपाई व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३' मधील कलम १०१ नुसार, पाच वर्षांत वापरात न आणलेली संपादित जमीन मूळ मालकांना परत देण्याची तरतूद आहे. बाळगंगा प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीला १६ वर्षे पूर्ण झाली असून अनेक जमिनींचे सातबारा उतारे कोरे झाले आहेत. त्यामुळे संबंधित जमीन पुन्हा शेतकऱ्यांच्या नावे करण्यात यावी, या प्रमुख मागणीसाठी बाल गंगा प्रकल्पग्रस्त शेतकरी बेमुदत उपोषणासाठी बसले असून जर लवकरात लवकर मागण्या मान्य नाही झाल्यास या पेक्षा तीव्र आंदोलन करण्यात येईल असे यावेळी आंदोलक कर्त्यानी इशारा दिला आहे.

# एसटी प्रवास १ मार्चपासून सवलतीसाठी 'NCMC' कार्ड अनिवार्य

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२८, विंचूर (नाशिक) :** लासलगाव राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) बसमधून प्रवास करणाऱ्या महिला, ज्येष्ठ नागरिक आणि सवलतधारकांसाठी मोठी बातमी आहे. १ मार्चपासून एसटी प्रशासनाने सर्व जुनी कार्ड बंद करण्याचा निर्णय घेतला असून, आता 'नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड' (NCMC) अनिवार्य करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, आतापर्यंत केवळ आधार कार्ड दाखवून मिळणारी सवलत बंद होणार असून, कार्ड नसल्यास प्रवाशांना पूर्ण तिकीट दर मोजावा लागणार आहे. सवलतींच्या नावाखाली होणारा गैरवापर रोखणे आणि व्यवहारांमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी एसटी महामंडळाने हे 'प्री-पेड' डिजिटल वॉलेट कार्ड सुरू केले आहे. यामुळे प्रवाशांना कॅशलेस प्रवासाची सुविधा मिळेल आणि वाहकांकडे असणारी सुट्या पैशांची कटकटही कायमची मिटणार आहे.




**कोणाला मिळणार लाभ? :**

महिला : तिकीट दरात ५०% सवलत.

ज्येष्ठ नागरिक (६५ ते ७५ वर्षे): ५०% सवलत.

**आधार कार्डवर सवलत बंद !**

प्रवाशांनी १ मार्चपूर्वी आपले NCMC कार्ड काढून घ्यावे. आधार कार्ड आता केवळ ओळखपत्र म्हणून ग्राह्य धरले जाईल, परंतु प्रत्यक्ष सवलत मिळवण्यासाठी डिजिटल कार्ड मशीनवर स्कॅन करणे बंधनकारक असेल.
**– सविता, आगार प्रमुख, लासलगाव आगार.**

अमृत ज्येष्ठ नागरिक (७५ वर्षांवरील): १००% मोफत प्रवास.

विद्यार्थी व दिव्यांग : नियमानुसार सवलत कायम.

**असे मिळवा तुमचे नवीन कार्ड (प्रक्रिया) :**

१. डेपो भेट: जवळच्या एसटी आगारातील 'स्मार्ट कार्ड' खिडकीवर संपर्क साधावा.


२. आवश्यक कागदपत्रे: आधार कार्ड अनिवार्य. विद्यार्थ्यांसाठी 'सरल' आयडी आणि दिव्यांगांसाठी 'UDID' कार्ड आवश्यक.

३. शुल्क: नवीन कार्डसाठी १९९ रुपये, तर जुने स्मार्ट कार्ड बदलून मिळवण्यासाठी १४९ रुपये शुल्क आकारले जाईल.

४. नोंदणी: अर्जासोबत मोबाईलवर आलेला जढझ दिल्यानंतर नोंदणी पूर्ण होईल. ३० दिवसांच्या आत कार्ड प्राप्त होईल.

रिचार्ज सुविधा : कार्डमध्ये किमान १०० रुपये बॅलन्स असणे आवश्यक आहे.

# कांदा उत्पादकांच्या डोळ्यांत पाणी; कोसळलेल्या दरामुळे लासलगावच्या शेतकऱ्याचे मुख्यमंत्र्यांना साकडे



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०१, लासलगाव (नाशिक) :** लासलगाव, देशातील कांद्याची प्रमुख बाजारपेठ असलेल्या नाशिक जिल्ह्यात सध्या कांदा उत्पादक शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. उत्पादन खर्चापेक्षाही कमी दर मिळत असल्याने शेतकऱ्यांना प्रति क्विंटल ७०० ते ८०० रुपयांचा तोटा सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर, लासलगाव येथील शेतकरी प्रकाश सर्जेराव पाटील यांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना निवेदन देऊन कांदा बाजारभावातील घसरण थांबवण्यासाठी 'दीर्घकालीन धोरणात्मक उपाययोजना' करण्याची मागणी केली आहे.

**उत्पादन खर्च १८००, भाव मिळतोय फक्त ८००!**

निवेदनात नमूद केल्यानुसार, सध्या नाशिकमधील बाजार समित्यांमध्ये दररोज सुमारे २ लाख क्विंटल लाल (खरीप) कांद्याची आवक होत आहे. या कांद्याला केवळ ८०० ते १००० रुपये दर मिळत आहे. दुसरीकडे, खते, मजुरी आणि बियाणांचा खर्च पाहता उत्पादन खर्च १५०० ते १८०० रुपयांच्या घरात आहे. खरीप कांदा टिकत नसल्याने शेतकऱ्यांना तो विकण्याशिवाय पर्याय उरलेला नाही, ज्याचा फायदा व्यापारी घेत असल्याचे चित्र आहे.

**गुजरातच्या धर्तीवर प्रक्रिया उद्योगांची गरज**

महाराष्ट्रातील कांदा प्रामुख्याने थेट खाण्यासाठी वापरला जातो. याउलट गुजरातमध्ये कांदा प्रक्रिया उद्योग विकसित झाल्यामुळे तेथील मागणी-पुरवठ्याचा समतोल राखला जातो. महाराष्ट्रातही सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्त्वावर कांदा फ्लेक्स, पावडर, पेस्ट आणि ऑईल निर्मितीचे उद्योग उभे राहिल्यास अतिरिक्त कांद्याचा प्रश्न सुटू शकतो, असे पाटील यांनी सुचवले आहे.

**निवेदनातील प्रमुख मागण्या :**

- ✓ **कांदा किंमत स्थिरीकरण मिशन :** राज्यस्तरावर स्वतंत्र यंत्रणा उभी करून दरातील चढ-उतारावर नियंत्रण ठेवावे.
- ✓ **भावांतर भरपाई :** बाजारभाव उत्पादन खर्चापेक्षा खाली गेल्यास सरकारने शेतकऱ्यांना थेट मदत द्यावी.
- ✓ **निर्यात धोरणात सातत्य :** बांगलादेश, श्रीलंका यांसारख्या पारंपरिक बाजारपेठांसोबतच युरोपीय देशांत नव्या बाजारपेठा शोधाव्यात.
- ✓ **प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन :** कांदा उपपदार्थांच्या निर्मितीसाठी भांडवली अनुदान आणि कर सवलती द्याव्यात.
- ✓ **साठवणूक सुविधा :** ग्रामीण स्तरावर आधुनिक शीतगृहे आणि साठवणूक केंद्रे उभारून बफर स्टॉकचे नियोजन करावे.

केवळ तात्पुरती मदत देऊन हा प्रश्न सुटणार नाही. जोपर्यंत शासन प्रक्रिया उद्योग आणि निर्यातीबाबत ठोस दीर्घकालीन धोरण आखत नाही, तोपर्यंत कांदा उत्पादकांचे मरण थांबणार नाही.

**– प्रकाश सर्जेराव पाटील (शेतकरी, लासलगाव)**

या निवेदनाच्या प्रती अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, पणन मंत्री जयकुमार रावल आणि जिल्हाधिकारी यांनाही पाठवण्यात आल्या असून, सरकार यावर काय ठोस निर्णय घेते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# कोकणच्या लाल मातीला लागली शिमगोत्सवाची चाहूल



कोकणात शिमगोत्सवाची चाहूल लागली असून गावागावांत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. पारंपरिक ढोल-ताशांच्या निनादात आणि रंगीबेरंगी मिरवणुकांच्या तयारीत संपूर्ण परिसर दुमदुमू लागला आहे. रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि रायगड जिल्ह्यांमध्ये शिमगोत्सवाला विशेष महत्त्व आहे. रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि रायगड जिल्ह्यांतील गावांमध्ये ग्रामदैवतांच्या पालख्या, पारंपरिक नृत्यप्रकार, तसेच दशावतारी नाट्यप्रयोगांची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. कोकणातील शिमगोत्सव हा केवळ धार्मिक नव्हे तर सांस्कृतिक एकात्मतेचा सोहळा मानला जातो. गावांमध्ये होळीकुंडासाठी लाकूडफाटा जमा करण्याची लगबग सुरू झाली आहे. तरुणाईत विशेष उत्साह दिसून येत असून पारंपरिक वेशभूषा, मुखवटे आणि रंगोत्सवासाठी लागणाऱ्या साहित्याची खरेदी वाढली



आहे. अनेक ठिकाणी भजन, कीर्तन आणि जगराचीही आखणी करण्यात येत आहे. स्थानिक प्रशासनाने सण शांततेत पार पाडण्यासाठी पोलीस बंदोबस्त व स्वच्छतेची विशेष तयारी केली जाणार आहे. पर्यटकांचीही कोकणाकडे ओढ वाढण्याची शक्यता असल्याने पर्यटन व्यावसायालाही चालना मिळणार आहे.

कोकणातील शिमगोत्सव हा लोकपरंपरा, श्रद्धा आणि आनंदाचा संगम असून या सणाच्या निमित्ताने गावागावांत बंधुभाव आणि एकोपा अधिक दृढ होताना दिसत आहे. लाखो कोकणी मुंबई, पुणेकर कोकणात येणार असल्याने लालपरीही सज्ज झाली आहे. कोकणात येण्यासाठी सुमारे १९८ जादा फेऱ्या सोडण्याचे नियोजन एसटी महामंडळ करत आहे. होळीच्या काळात प्रवाशांचा प्रवास सुरक्षित, वेगवान, स्वस्त व्हावा यासाठी एसटी महामंडळाने वाढीव फेऱ्या सोडण्याचे नियोजन केले आहे. मुंबई, ठाणे, पालघर आणि रायगड या विभागांतून तब्बल १९८ जादा फेऱ्या सोडण्यात येणार आहेत. होळीनिमित्त हजारो प्रवाशांचा प्रवास सुरक्षित, सुलभ व्हावा यादृष्टीने प्रयत्न सुरू असून, या विशेष मोहिमेत सर्वाधिक फेऱ्यांचे नियोजन ठाणे आणि मुंबई विभागांतून करण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

कोकणासाठी ठाण्यातून ७९ फेऱ्यांचे नियोजन असून, मुंबई विभागातून ६२ फेऱ्या नियोजित आहेत. २५ फेऱ्या गट आरक्षणासाठी उपलब्ध करण्यात आल्या आहेत. पालघर विभागातून २४ फेऱ्या पूर्णपणे गट आरक्षणाच्या माध्यमातून चालवण्यात येणार आहेत. रायगड विभागातून ३३ फेऱ्या होणार असून, त्या सर्व आरक्षित प्रवाशांसाठी उपलब्ध आहेत. या विशेष मोहिमेतील सर्वाधिक गर्दी २८ फेब्रुवारी आणि १ मार्च या दोन दिवशी अपेक्षित आहे. २८ फेब्रुवारी रोजी तब्बल ९१ फेऱ्या, तर १ मार्च रोजी ५९ फेऱ्या नियोजित करण्यात आले आहे. कोकण रेल्वे ही चाकरमानी पुणे व मुंबईकरांसाठी सज्ज झाली आहे. रेल्वेच्या जादा फेऱ्या कोकण रेल्वे मार्गावर सोडण्यात येणार आहे.

# जीवनाचे गणित बिघडू देऊ नका !

लाखो-करोडो वर्षांपूर्वीचा आदिमानव आजच्या आपल्या आजूबाजूला दिसणाऱ्या प्राणीमात्रांसारखाच जगत असावा. त्याला फारशी जाणीव नव्हती; तो असंस्कृत होता. सकाळी झोपेतून उठल्यापासून अंधार पडेतो तो इतर प्राण्यांप्रमाणे भटकत असे. त्याला कुटुंबाची जाणीव नव्हती, ना येणाऱ्या पिढ्यांची काळजी.

पुढे शेतीचा शोध लागला, कुटुंबव्यवस्था निर्माण झाली आणि माणसाने आपली ठराविक दिनचर्या आखली. सकाळी न्याहारी करून शेतात जाणे, दिवसभर कष्ट करणे, संध्याकाळी दमून घरी परत येणे-येता-येता शेतातील भाजीपाला, फळे, कंदमुळे आणणे, बाजारातून जीवनावश्यक वस्तू घेऊन येणे-हे सर्व तो कुटुंबवत्सल भावनेतून करत होता. गाव, बाजार, दळणवळण यांची निर्मिती झाली आणि माणूस अधिक हुशार होत गेला. औद्योगिक क्रांतीनंतर तर त्याने आपले जीवन अधिक सुखी आणि समृद्ध करायला हवे होते; परंतु तसे झाले नाही. आजही प्रत्येक माणूस प्रगती करू शकलेला नाही. सुख, समाधान आणि नवचैतन्य प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसत नाही.

मेंदूचा विकास होऊन मानवाने भौतिक, जैविक, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, वैज्ञानिक आणि आध्यात्मिक प्रगती साधली; तरीही काहीजण आपला मेंदू जाणीवपूर्वक बधिर ठेवण्याचा प्रयत्न का करतात? दारू, गांजा यांसारख्या नशायुक्त पदार्थांचे सेवन करून विकसित मेंदू बंद पाडण्याचा हट्ट का धरतात? असे करून त्यांना जीवनाचे गणित बिघडवायचे आहे का?

पैसा हा विनिमयाचे साधन आहे. तो जुगार, मटका, लॉटरी यांवर लावून जिंकणे किंवा हरणे यात कोणता आनंद मिळत असेल ? पैसा कष्टाने कमवावा! हा नियम सर्वमान्य असतानाही चोरी, भ्रष्टाचार, लूटमार का केली जाते? यातून जीवनाचे गणित बिघडत आहे, हे का समजत नाही?

अनैतिकता ही जंगलीपणाचाच एक प्रकार आहे, हे कळूनही माणूस का वासनाधिन बनतो ? अनेक व्यक्तींशी अनैतिक संबंध ठेवणे ही विकृती आहे, हे ठाऊक असूनही त्याकडे दुर्लक्ष का करतो ? महिलांना तोकड्या कपड्यांत झगमगत्या प्रकाशात नाचवून पुरुषांना कोणता आनंद मिळतो? मावा, गुटखा यांसारखे आरोग्यास अपायकारक पदार्थ सेवन करून रस्त्यावर थुंकणे ही कोणती उंची आवड आहे ? यातून आपल्या जीवनाचे गणित बिघडत आहे, हे कधी ध्यानात येत नाही का ?

बुलेटसारख्या गाड्यांचे सायलेन्सर बदलून मोठमोठ्याने आवाज करत वेगाने गाड्या पळवून कोणते पदक मिळते? दोन संघ क्रिकेट खेळत असताना त्यावर पैसे लावून स्वतःच्या घरादाराचीराखरांगोळी करण्यात कोणता उच्च आनंद आहे? दुसऱ्यावर हुकूमत गाजवण्यासाठी, आपली दहशत बसवण्यासाठी हिंसाचार करून गुन्हेगारी जीवन जगण्यात काय मजा आहे ? यातून आपल्या जीवनाचे गणित बिघडते हे ध्यानात घेतलेच पाहिजे!

विज्ञान सांगते की मेंदूमध्ये डोपामिनसारखे रसायन स्त्रवते आणि त्यातून क्षणिक आनंद मिळतो. पण त्या क्षणिक आनंदासाठी आयुष्याची शाश्वत शांती गमावणे योग्य आहे का? आपण करत असलेल्या कृतींचे परीक्षण, चिंतन आणि परिशीलन माणूस का करत नाही? माणसाच्या वागण्याला, बोलण्याला आणि जीवनाला मर्यादा उरल्या नाहीत, असे का वाटते? एकाने चूक केली म्हणून दुसऱ्यानेही तशीच चूक करून अनैतिकतेची खोली वाढवणे योग्य आहे का?

शेवटी, जीवनाचे गणित बिघडू न देणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. हे गणित १+१=२ इतके सोपे आहे. पण १+१=११, १११, ११११ अशी अवास्तव उत्तरे मिळवण्याच्या हव्यासात आपण आयुष्यच बरबाद करत आहोत. क्षणिक आनंदापेक्षा दीर्घकालीन समाधान महत्त्वाचे आहे. विवेक, संयम आणि नैतिकतेच्या आधारावरच जीवनाचे खरे गणित जुळते. अन्यथा प्रगतीच्या नावाखाली आपण पुन्हा आदिमानवाच्या पातळीवर जाऊ.



**- किशोर जाधव**
**सोलापूर**
**मो.९९२२८८२५४१**

# अपप्रवृत्तीमुळे पवित्र सणाला गालबोट लागते

होळी हा आपल्या संस्कृतीतील एक मोठा आणि महत्वाचा सण आहे. भारतातील वेगवेगळ्या भागात फाल्गुन पौर्णिमेला हा सण विविध नावांनी साजरा केला जातो. हा सण होळी, होलिकादहन, शिमगा, हुताशनी महोत्सव, दोलायात्रा, कामदहन अशा विविध नावांनी साजरा केला जातो. होळीच्या दिवशी आपण आपल्या मनातील वाईट विचारांना होळीप्रमाने आगीत जाळून राख करावे अशी कल्पना आहे. त्यामुळे आपले मन निर्मळ व्हावे अशी अपेक्षा असते. आपल्या मनातील वाईट विचारांना होळी प्रमाणे आगीत जाळून सत्प्रवृत्ती आणि सद्गुणांचा संकल्प करण्याचा हा दिवस. महाराष्ट्रात हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. कोकणात तर हा सण अधिक मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. कोकणात हा सण पाच ते पंधरा दिवस असतो. होळीच्या दुसऱ्या दिवशी धुलीवंदनाचा सण साजरा केला जातो. याला धुळवड असेही म्हणतात. होळीच्या दुसऱ्या दिवशी अग्नीत गव्हाच्या ओंब्या भाजण्याची प्रथा आहे. या दिवसात गव्हाचे पीक तयार होते हे त्यामागील एक कारण असू शकते. नवीन पीक अग्नी देवतेला समर्पित करण्याची प्रथा आहे. या दिवशी एकमेकांना गुलाल लावून रंगाची उधळण करणे. सर्वांनी एकत्र येणे, बंधुभाव आणि एकता जपणे हा याचा उद्देश. बंधुभाव आणि एकतेचे प्रतीक म्हणून या सणाकडे पाहिले जाते. या दिवशी लोक आपसातील भेदभाव भांडण विसरून एकत्र येतात मात्र गेल्या काही वर्षात या सणामध्ये शिरलेल्या अपप्रवृत्तीमुळे या सणाचे पावित्र्य लोप पावले आहे. होळीचा सण साजरा करताना धांगडधिंगा घातला जातो. धुलीवंदनाच्या दिवशी तर एकमेकांना गुलाल लावण्याऐवजी रसायन मिश्रित रंग लावले जातात. पाण्याचा अपव्यय केला जातो. काही समाज कंटक पाण्याने, रंगाने भरलेले फुगे, पिशव्या रेल्वे गाड्या, बसगाड्यावर तसेच रस्त्यावर फेकून मरतात. त्यात अनेकजण जखमी होतात. अशा घटनांत यापूर्वी काहींना आपले डोळे गमवावे लागले आहेत तर काहींना कायमचे अपंगत्व आले आहे. काही महाभाग तर जाणीवपूर्वक महिलांना टार्गेट करतात. काहीजण रंगाऐवजी नासकी अंडी फेकून मारतात. काहीजण तर या दिवशी लाऊस्पिकरवर मोठ्या आवाजात गाणी लावून हिडीस नृत्य करतात. धुलीवंदनच्या दिवशी मद्यपान करण्याची नवीनच फॅशन निर्माण झाली आहे. मद्यपान करून नृत्य करताना बऱ्याचदा वाद होतो. हा वाद विकोपाला गेला तर कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. वास्तविक होळी आणि धुलीवंदन हे अतिशय पवित्र सण आहेत. मात्र या अपप्रवृत्तीमुळे या सणाला गालबोट लागत आहे. ही अपप्रवृत्ती दूर करून सर्वांनी होळीचा सण साजरा करावा. जे समाज कंटक या पवित्र सणाला गालबोट लावतील त्यांना पोलिसांनी कडक शासन करावे.



**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**मो.९९२२५४६२९५**

# होळीला बाजारात खरा रंग कसा ओळखायचा ?

केमिकल रंगांचा वाढता धोका सगळीकडेच आहे. होळीचा सण म्हणजे आनंदाची उधळण. मात्र बाजारपेठेत सध्या रासायनिक आणि बनावट रंगांची मोठी आवक झाली आहे. केमिकल युक्त हे गडद रंग दिसायला आकर्षक असले तरी ते तिथकेच घातक ही आहेत. या रंगात शिसे, पारा, क्रोमियम आणि काचेचे बारीक कण मिसळलेले असतात. हे घटक केवळ त्वचेसाठीच नव्हे, तर डोळे आणि केसांसाठीही अत्यंत घातक ठरू शकतात. त्यामुळे अशा रंगापासून दुर राहा. नाही तर रंगाचा बेरंग होण्यास वेळ लागणार नाही. त्यामुळे खरा आणि खोटा रंग कसा ओळखावा हे आम्ही तुम्हाला सांगणार आहोत.



**अशी करा अस्सल गुलालाची ओळख**

**१. वासावरून ओळखा:** नैसर्गिक किंवा सेंद्रिय गुलालचा वास अत्यंत सौम्य आणि फुलांसारखा असतो. जर गुलालातून पेट्रोल, रॉकेल किंवा तीव्र रासायनिक वास येत असेल, तर तो भेसळयुक्त समजावा.

**२. पाण्यात विरघळून पहा:** थोडासा गुलाल पाण्यात टाका. जर तो पूर्णपणे विरघळला आणि तळाला काहीही उरले नाही, तर तो सुरक्षित असू शकतो. मात्र, काही कण तरंगत राहिल्यास तो वापरणे टाळा.

**३. स्पर्श करून पहा:** अस्सल गुलाल हातावर चोळल्यास तो मऊ आणि बारीक लागतो. जर तो खरखरीत किंवा त्यात चमकणारे कण दिसले, तर तो काचेची पूड असलेला असू शकतो.

होळी खेळण्यापूर्वी घ्यायची काळजी त्वचेचे संरक्षण करण्यासाठी होळी खेळण्यापूर्वी अंगाला खोबरेल किंवा मोहरीचे तेल लावावे. डोळ्यांच्या सुरक्षेसाठी कॉन्टॅक्ट लेन्स टाळून चष्मा वापरावा. तसेच, पूर्ण बाह्यांचे कपडे घातल्यास रंगाचा थेट संपर्क टाळता येतो. रंग काढताना त्वचा जोरात न घासता बेसन, दही किंवा तेलाचा वापर करावा. त्यामुळे तुम्हाला कोणताही त्रास होणार नाही. कारण सध्या बाजारात मोठ्या प्रमाणात भेसळ युक्त रंग विकण्यास आले आहेत. त्यात केमिकलचा वापर ही भरमसाट करण्यात आला आहे. त्यामुळे ही काळजी घेणे गरजेचे आहे.

आरोग्यदायी होळीसाठी काही नियम नक्कीच आहे. ते प्रत्येकाने फॉलो करणे गरजेचे आहेत. होळी खेळताना पूर्ण कपडे घाला जेणेकरून शरीराचा कमीत कमी भाग उघडा राहील. केसांच्या संरक्षणासाठी तेल लावून बांधून ठेवा. रंग काढण्यासाठी त्वचा जोरात चोळू नका, त्याऐवजी बेसन आणि दह्याचे मिश्रण वापरा. पॅकेटवर घटक तपासूनच खरेदी करा. नैसर्गिक रंग वापरून आपली आणि आपल्या प्रियजनांची होळी सुरक्षित आणि आनंददायी करा.



# वजन कमी आणि सौंदर्यासाठी आवळ्याचा जादुई फॉर्म्युला

शरीर निरोगी ठेवण्यासाठी योग्य आणि संतुलित पोषण मिळणे अत्यंत आवश्यक असते. व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्सने परिपूर्ण असलेला आवळा हा आरोग्यासाठी अतिशय उपयुक्त मानला जातो. केस, त्वचा आणि पचनाशी संबंधित अनेक समस्या दूर करण्यासाठी आवळ्याचा वापर फायदेशीर ठरतो. आहारात आवळ्याचा समावेश अनेक प्रकारे करता येतो - काहीजण तो भाजी स्वरूपात खातात, तर काहींना कच्चा आवळा खाणे आवडते. एका आवळ्यासोबत कच्च्या हळदीचा एक छोटा तुकडा, आल्याचा तुकडा आणि चिमूटभर काळी मिरी घ्या. हे सर्व घटक मिक्सरमध्ये एकत्र वाटून रस तयार करा. सकाळी रिकाम्या पोटी हा रस प्यायल्याने शरीराला अनेक फायदे होतात.

# युद्ध...

युद्धामध्ये साधायची
महत्त्वाची युध्दनिती
युध्द पर्याय शेवटचा
तह करणे हीच नीती

युध्द परिणाम अंदाज
होऊ शके काय क्षति
मनुष्य हानी अटळसे
अनेका मिळेल सद्गति

अंतस्थ कोण विरोधक
कळीचे मुद्दे उपस्थिती
आपले सैन्य मनोबल
जाणे त्यांची मनस्थिती

शत्रूपक्षांची संकलीत
प्रथम समग्र माहिति
शस्त्र साठा सैन्य बल
जाणायचे कसे किती

आजूबाजू कोण मित्र
कुणा मिळेलं सहमति
परिवार साथी सोबती
घ्यावी आधी अनुमति

रे भडकता युध्दएकदा
ठरलीनक्की अधोगती
युध्दविराम कधी मिळे
कुणाच्यांही नाही हाती

युध्द काळ वातावरण
कशी आहे परिस्थिती
अभ्यास हवा परिपूर्ण
निसर्गाची कायस्थिती

बहिस्थकोण विरोधक
शत्रू संगे रे कोण जाती
तटबंदी विचीत्रभोवती
आडवे येती धर्म जाति

**हेमंत मुसरीफ,**
**पुणे.**
९७३०३०६९९६

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## कांदा दरावरून विंचूरमध्ये रणकंदन
# ‘स्वाभिमानी’कडून महामार्ग अर्धा तास रोखला

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०१, विंचूर (नाशिक) :** विंचूर येथे कांद्याला योग्य हमीभाव मिळावा आणि कोलमडलेल्या बाजारपेठेतून शेतकऱ्यांना बाहेर काढावे, या मागणीसाठी आज विंचूर येथे स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने आक्रमक ‘रस्ता रोको’ आंदोलन करण्यात आले. नाशिक-संभाजीनगर महामार्गावर विंचूर कृषी उत्पन्न बाजार समितीसमोर सुमारे अर्धा तास वाहतूक रोखून धरत शेतकऱ्यांनी सरकारचा निषेध केला.

**उत्पादन खर्च अडीच हजार, विक्री मात्र ८०० रुपयांत!**

आंदोलनकर्त्यांनी यावेळी शासनाकडे विविध मागण्यांचे निवेदन दिले. सध्या कांदा उत्पादनासाठी प्रतिक्विंटल सुमारे २५०० रुपये खर्च येत असताना, बाजार समित्यांमध्ये कांदा केवळ ७०० ते ८०० रुपये दराने विकला जात आहे. यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे.

**प्रमुख मागण्या :**

लाल कांदा उत्पादकांना प्रतिक्विंटल १५०० रुपये अनुदान द्यावे.

रब्बी हंगामातील उन्हाळ कांद्यासाठी केंद्र सरकारने तातडीने प्रोत्साहनपर अनुदान जाहीर करावे.

अस्थिर आयात-निर्यात धोरणामुळे होणारे शेतकऱ्यांचे नुकसान थांबवावे.

केंद्र सरकारच्या चुकीच्या आयात-निर्यात धोरणामुळे कांदा उत्पादक देशोधडीला लागला आहे. जर आमच्या मागण्या मान्य झाल्या नाही, तर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींना गावबंदी करू आणि त्यांना फिरू देणार नाही, असा इशारा संघटनेचे जिल्हाध्यक्ष निवृत्ती गारे पाटील यांनी यावेळी दिला.



**लाल कांद्याला १५०० रुपये अनुदानाची मागणी; अन्यथा लोकप्रतिनिधींना फिरू न देण्याचा निवृत्ती गारे यांचा इशारा**

**लोकप्रतिनिधींच्या मौनावर प्रश्नचिन्ह**

सिन्नर बाजार समितीचे सभापती कृष्णा घुमरे यांनी यावेळी बोलताना लोकप्रतिनिधींवर कडक शब्दांत ताशेरे ओढले. स्वतःला शेतकरी पुत्र म्हणवणारे लोकप्रतिनिधी आज शेतकऱ्यांच्या प्रश्नावर गप्प का आहेत? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. तर, सिन्नर तालुकाध्यक्ष आत्माराम पगार यांनी रात्रंदिवस कष्ट करूनही पदरी निराशाच येत असल्याची खंत व्यक्त केली.

येवला तालुकाध्यक्ष विलास दरगुडे यांनी आगामी काळात आवक वाढल्यास दर अधिक कोसळण्याची भीती व्यक्त करत शासनाने त्वरित हस्तक्षेप करण्याची मागणी केली.

या आंदोलनासाठी निफाड तालुकाध्यक्ष गजानन आबा घोटेकर, मच्छिंद्र जाधव, संदीप घोटेकर, बाळासाहेब गीते, दत्तू गायकवाड यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी ठोकळवाडीचे ग्रा.पं. सदस्य चंदू लांडबले व विंचूरचे सरपंच सचिन दरेकर यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

## माधवराव पाटील महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.०१, पालम (परभणी) :** माधवराव पाटील महाविद्यालयात दिनांक २८ फेब्रुवारी रोजी डॉ. सी. व्ही. रमण यांच्या संशोधनाच्या स्मृतिदिनानिमित्त राष्ट्रीय विज्ञान दिवसाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा व संशोधनाची आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विज्ञान प्रदर्शन व विद्यार्थ्यांच्या सादरीकरणांना सुरुवात झाली. रतिकांत शिंदे, पार्थ गडगिळे, माऊली दुधाटे या विद्यार्थ्यांनी विज्ञानातील नवकल्पना, तंत्रज्ञानातील प्रगती आणि दैनंदिन जीवनातील वैज्ञानिक उपयोग यांवर प्रभावी सादरीकरण केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. एच. टी. सातपुते यांनी भूषविले तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. एस. बी. झांगडे व डॉ. डी. पी. गडगिळे उपस्थित होते. प्रास्ताविक भाषणात डॉ. एस. बी. झांगडे यांनी नोबेल पारितोषिक विजेत्यांच्या कार्याचा आढावा घेत विद्यार्थ्यांना विज्ञान क्षेत्रातील प्रगतीची माहिती दिली. त्यांनी विज्ञानातील नवनवीन संशोधन, आधुनिक तंत्रज्ञान आणि त्याचे समाजजीवनातील महत्त्व यावर सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. डी. पी. गडगिळे यांनी वनस्पतिशास्त्रातील अलीकडील संशोधन, पर्यावरण संरक्षणातील वैज्ञानिक दृष्टिकोन आणि जैवविविधतेचे महत्त्व स्पष्ट केले.

## किन्हवलीत श.चं.स. विद्यालयात शिव व्याख्याते प्रा. नवनीत यशवंतराव यांचा सत्कार




**अक्षराज : रविंद्र खाडे**

**दि.०१, शहापूर (ठाणे) :** शिवजयंती उत्सव आणि मराठी भाषा गौरव दिनाच्या औचित्याने किन्हवली येथील शहा चंदूलाल सरुपचंद विद्यालय येथे सुप्रसिद्ध शिव व्याख्याते प्रा. नवनीत नंदकुमार यशवंतराव यांचा विद्यालयातर्फे गौरव करण्यात आला. याच वेळी त्यांच्या ‘शिवराय समजून घेताना’ या पुस्तकाचे प्रकाशनही मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

ठाणे जिल्ह्यातील नावाजलेले व्याख्याते प्रा. नवनीत यशवंतराव गेली दहा वर्षे महाराष्ट्रासह गुजरात, हरियाणा, कर्नाटक आदी राज्यांत शिवचरित्रावर प्रभावी व्याख्याने देत आहेत. त्यांच्या अभ्यासपूर्ण आणि प्रेरणादायी वक्तृत्वामुळे तरुणाईत इतिहासाबद्दल जागर निर्माण होत आहे. कार्यक्रमास विद्यालयाचे मुख्याध्यापक गोपाळ वेखंडे, सावंत सर, खकाल सर तसेच ज्युनियर कॉलेजचे सर्व शिक्षक उपस्थित होते.

**पुस्तकाविषयी बोलताना प्रा. नवनीत यशवंतराव यांनी सांगितले की, ‘शिवराय समजून घेताना’ हे पुस्तक सर्व वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी भाषण मार्गदर्शक ठरेल. ध्येयवेड्या युवकांना स्वतंत्र ओळख निर्माण करण्यासाठी, पालकांना आदर्श संस्कारासाठी आणि अधिकाऱ्यांना सुशासनासाठी हे पुस्तक उपयुक्त ठरेल, असा त्यांचा विश्वास आहे.**

यावेळी मनोगत व्यक्त करताना मुख्याध्यापक गोपाळ वेखंडे म्हणाले, नवनीत यशवंतराव हा आमचा पाचवी ते पंधरावीपर्यंतचा विद्यार्थी आहे, याचा आम्हा सर्व शिक्षकांना अभिमान वाटतो. अनेक विद्यार्थी अभियंता, डॉक्टर, वकील होतात; मात्र आमच्या शाळेच्या यशस्वी विद्यार्थ्यांच्या मांदियाळीत आज एका साहित्यिकाची भर पडली आहे. शाळेच्या वतीने आम्ही त्यांचा सत्कार करत असून पुढील वाटचालीस शुभेच्छा देतो.

# हीच आंबेडकरी सांस्कृतिक चळवळीची भूमिका - कवी चक्रनारायण

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.०१, नेवासा (अहिल्यानगर ) :** किशोर चक्रनारायण यांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील सौंदाळा या भारतातील पहिले जातमुक्त गाव म्हणून ओळख निर्माण केलेल्या गावाला सदिच्छा भेट देत ग्रामस्थांशी संवाद साधला. यावेळी सरपंच शरदराव आरगडे व ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. साधेपणा, सामाजिक सलोखा आणि परिवर्तनाची जाणीव यांचा प्रत्यय देणारे वातावरण या भेटीदरम्यान अनुभवायला मिळाले.



सौंदाळा गावाने जात-पात, उंच-नीच आणि भेदभावाच्या भिंती पाडून ‘माणूस’ या एकाच नात्याने समाजरचना उभी केली आहे. महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समतेच्या, बंधुत्वाच्या आणि न्यायाच्या विचारांवर उभारलेली सामाजिक बांधणी पाहून कवी चक्रनारायण यांनी समाधान व्यक्त केले. गावातील सर्व घटकांनी एकत्र येत घेतलेला जातमुक्ततेचा निर्धार आणि त्यासाठी केलेले प्रयत्न केवळ प्रशंसनीय नसून अनुकरणीय असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी बोलताना ते म्हणाले, सौंदळासारखी सामाजिक क्रांती घडवून आणण्यासाठी प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात जाण्याची धमक लागते. परिवर्तन केवळ घोषणांनी होत नाही; ते ठाम भूमिकेतून, सातत्यपूर्ण कृतीतून आणि वैचारिक बांधिलकीतून घडते. सौंदाळा गावाने परिवर्तनाची जी ठिणगी टाकली आहे, ती संपूर्ण देशभर पसरवण्याची जबाबदारी आता आपली आहे. समाज विचारांनी प्रगल्भ झाला तरच आपण सशक्त पिढी घडवू शकतो. आंबेडकरी सांस्कृतिक चळवळीची भूमिका ही याच परिवर्तनवादी विचारांना बळ देणारी, विषमता आणि अन्यायाविरुद्ध सांस्कृतिक पातळीवर लढा उभारणारी आहे.

सामाजिक परिवर्तनासाठी केवळ राजकीय इच्छाशक्ती पुरेशी नसून सामाजिक जाणीव जागृत करणे हेच आंबेडकरी सांस्कृतिक चळवळीचे प्राथमिक ध्येय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. गावपातळीवर सुरू झालेले हे प्रयोग राज्य आणि देशासाठी दिशादर्शक ठरू शकतात. जातमुक्ततेचा आदर्श उभा करून सौंदाळ्याने सामाजिक समतेच्या लढ्यात ऐतिहासिक पाऊल टाकले असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

या भेटीत श्रीरामपूर येथील बोरावके महाविद्यालयाचे प्रा. डॉ. मेघराज औटी, प्रा. रवींद्र आदमाने, प्रा. राहुल राऊत, प्रा. कल्पना कांबळे तसेच राज्यशास्त्र विषयाचे अभ्यासक विद्यार्थी उपस्थित होते. ग्रामस्थांनीही जातमुक्ततेकडे वाटचाल करताना आलेल्या अडचणी, समाजातील प्रतिकार आणि त्यावर मात करण्यासाठी घेतलेल्या भूमिकेची माहिती दिली.

# थोडक्यात

## महापौर बाल चित्रकला स्पर्धा संपन्न

**अक्षराज : प्रभाकर हजारे**

**दि.०१, वरळी (मुंबई) :** दरवर्षी जानेवारी महिन्यातील पहिल्या आठवड्यातल्या रविवारी घेण्यात येणारी बाल चित्रकला स्पर्धा वरळी विभागात सुरळीतपणे संपन्न झाली.

याबाबत सविस्तर माहिती अशी की आज दि.१ मार्च रोजी जी /दक्षिण विभागामध्ये जागतिक कीर्तीचे व्यंगचित्रकार आदरणीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख श्रीमान बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती उत्सवानिमित्त माझी मुंबई या संकल्पनेवर आधारित महापौर आयोजित बालचित्रकला स्पर्धा २०२५-२६ चे आयोजन करण्यात आले होते.जी/ दक्षिण विभागातील तीन मैदानांवर ही स्पर्धा घेण्यात आली.वरळी सी फेस येथील तथागत गौतम बुद्ध उद्यान आणि हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे उद्यान तसेच श्रमिक मैदान करीरोड या तीन मैदानावर ही स्पर्धा एकूण चार गटांमध्ये घेण्यात आली. चार गटांमध्ये वेगवेगळ्या वर्गातील मुलगे-मुली सहभागी झाले होते.या स्पर्धेला एकूण १३७० एवढे विद्यार्थी सहभागी झाले होते.स्पर्धेच्या वेळी जी /दक्षिण विभागाच्या प्रशासकीय अधिकारी श्रीमती वर्षा गांगुर्डे,विभाग निरीक्षक सुरेश घिगे,पूनम शिंदे व शारीरिक शिक्षण चे कनिष्ठ पर्यवेक्षक अनिल मोरे यांनी भेट दिली.बृहन्मुंबई महानगरपालिका च्या वतीने घेण्यात आलेल्या या स्पर्धे साठी सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना ड्रॉइंग सीट व खाऊ खाऊचे वाटप करण्यात आले होते.




## लालबाग सार्वजनिक गणेश उत्सव मंडळातर्फे ‘साडी’ वाटप



**अक्षराज : अनंत बोरसे**

**दि.०१, शहापूर (ठाणे) :** मुंबईमधील लालबाग सार्वजनिक गणेश ऊत्सव मंडळ, गणेशगल्ली ’मुंबई ’ चा राजा ऊत्सव मंडळातर्फे दरवर्षी नवरात्र ऊत्सव साजरा केला जातो यावेळी अनेक भक्तांकडुन देवी अंबामातेला साडी अर्पण केली जाते, आणि देवीचा प्रसाद म्हणून महिला भगिनींना या साड्यांचे वाटप केले जाते.अभ्युदय चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या सहकार्याने या साड्यांचे वाटप शहापूर येथील श्रीकृष्ण मंदिर, चैत्रबन गृहनिर्माण संस्था येथे शनिवारी करण्यात आले. सुरुवातीला चैत्रबन गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष महेश भावे यांनी ऊपस्थितांचे स्वागत केले. लालबाग सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ लालबागचा राजा मंडळाचे पदाधिकारी नंदु तावडे ऊपाध्यक्ष, नंदु बागवे ऊपाध्यक्ष, संजय घाडी , विनोद कोरगावकर, सुभाष पेडणेकर, नरेंद्र कोल्हे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. शुभदा पवार, शकुंतला जाधव, शुभांगी देशपांडे, स्मिता जयवंत, सुधा पटेल, मालन वरथे, अर्चना जोशी, योगिता चंदगीर, मिनाक्षी बिन्नर अशा अनेक महिलांना एकुण सत्तर साडी प्रसाद म्हणून वाटण्यात आल्या. यावेळी अनेक नागरिक ऊपस्थित होते.

## के.रामलू शाळेमध्ये विज्ञान प्रदर्शन

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.०१ कुंडलवाडी (नांदेड) :** राष्ट्रीय विज्ञान दिवसाचे औचित्य साधून के. रामलू शाळेमध्ये सी वी रमण व मिसाईल मेन डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करून या विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी विद्यार्थ्यांनी एकाहून एक सरस प्रतिकृतींचे सादरीकरण करीत त्या प्रोजेक्ट बद्दल सविस्तर माहिती दिली. यामुळे शाळेत बाल वैज्ञानिकांची

या प्रदर्शनामध्ये शाळांमधील जवळपास ३४प्रोजेक्ट प्रतिकृतींचे सादरीकरण करण्यात आले व एकूण सहभागी विध्यार्थी ८२होते.यात आरोही कुंडलवाडीकर व वर्षीता शिंगणवाड यांनी भूकंप अलार्म व तसेच ईशान चव्हाण याने चंद्राच्या कला ( या उपकरणाचे सादरीकरण केले त्यात त्यांना प्रथम क्रमांक मिळाला. विद्युत प्रवाह आरुष, वरुणतेज, रत्नेश, कृष्णा व तसेच विद्युत बल्ब सार्थक लिंगमपल्ले, संभव माचनुरे यांनी या उपकरणाचे सादरीकरण केले यात त्यांना द्वितीय क्रमांक मिळाला. तसेच मानवी हृदयाचा नमुना सिझा शेख, संस्कृती व स्वरांगी यांनी मानवी हृदय तर वायू प्रदूषण तन्मय पवार, सिद्धेश तीपनोड यांनी हे उपकरणाचे सादरीकरण करून तृतीय क्रमांक मिळविला आहे.बक्षीस पात्र विद्यार्थ्यांना गोल्ड, सिल्वर,ब्रांज मेडल देऊन सत्कार करण्यात आले सर्व सहभागी विद्यार्थ्यांना पेन देऊन कौतुक करण्यात आले इयत्ता चौथी, पाचवी सहावीच्या पात्र विद्यार्थ्यांना देखील बक्षीस देण्यात आले यात या उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष साईरेड्डी ठक्कुरवार सचिव यशवंत संगमवार संचालिका रमा ठक्कुरवार प्रिंसिपल एस जाधव, व्हाय प्रिंसिपल एम सपना यांनी विध्यार्थीचे कौतुक केले. प्रदर्शनासाठी प्रिंसिपल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली अश्विनी तुंगेनवार, संध्या पाठक, दार्शयानी नुग्रावार,सुधा मदिकुंटावार,लतिका जडलवार,मेघा नामावार,मयुरी शेवाळे, गीता धात्रक, राणी मठवाले, विकास मिसाळे, कृपेश पडकुटलावार,गणेश जेठाळकर, आदींनी परिश्रम घेतले.